जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २२८ | शनिवार, १४ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

## संक्षिप्त

### ग्रामीण भागात ४५ दिवसानंतर नवीन गॅस बुक करावा लागणार

**नवी दिल्ली, ता. १३ :** इस्रायल इराण युद्धामुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने एलपीजी सिलिंडर बुकिंग मधील किमान अंतर वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. शहरांमध्ये बुकिंगमधील किमान कालावधी २१ दिवसांवरून २५ दिवस करण्यात आला असून ग्रामीण आणि दुर्गम भागात तो २५ दिवसांवरून ४५ दिवस करण्यात आला आहे. ही माहिती केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह यांनी गुरुवारी लोकसभेत दिली. पुरी म्हणाले, मागणी व्यवस्थापनासाठी शहरांमध्ये किमान २५ दिवसांचे आणि ग्रामीण तसेच दुर्गम भागांमध्ये ४५ दिवसांचे बुकिंग अंतर निश्चित करण्यात आले आहे. जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता वाढली आहे. विशेषतः जगातील महत्त्वाच्या तेल वाहतूक मार्गापैकी एक असलेल्या होमुर्झच्या सामुद्रधुनीत झालेल्या हल्ल्यांनंतर ही परिस्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान, घरगुती एलपीजी सिलिंडरच्या वितरण वेळेत कोणताही बदल झालेला नाही.

# लोणी काळभोर येथील कन्या प्रशालेचा जिल्ह्यात डंका

## एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेचा ९९ टक्के निकाल

## तब्बल ५४ विद्यार्थिनींची गुणवत्ता यादीत चमकदार कामगिरी

**लोणी काळभोर, ता. १२ :** राष्ट्रीय अर्थ कम गुणवत्ता शिष्यवृत्ती (एनएमएमएस) परीक्षेत लोणी काळभोर येथील कन्या प्रशालेच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन करत जिल्ह्यात आपला ठसा उमटवला आहे. प्रशालेचा तब्बल ९९ टक्के निकाल लागला असून तब्बल ५४ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या उल्लेखनीय यशामुळे कन्या प्रशालेच्या विद्यार्थिनींचा जिल्ह्यात दबदबा निर्माण झाला असून सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे.

डिसेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या राष्ट्रीय अर्थ कम गुणवत्ता शिष्यवृत्ती परीक्षेत पुणे जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. अत्यंत स्पर्धात्मक समजल्या जाणाऱ्या या परीक्षेत लोणी काळभोरच्या कन्या प्रशालेतील विद्यार्थिनींनी उत्कृष्ट कामगिरी करत शाळेचा नावलौकिक वाढवला. यशस्वी विद्यार्थिनींना शिक्षक अरविंद राठोड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

एनएमएमएस परीक्षा एकूण १८० गुणांची असून त्यामध्ये बुद्धिमत्ता चाचणी, गणित, विज्ञान आणि समाजशास्त्र या विषयांचा समावेश असतो. या परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना ९ वी ते १२ वीपर्यंत दरवर्षी केंद्र सरकारकडून १५ हजार रुपये शिष्यवृत्ती मिळते. याशिवाय केंद्राच्या गुणवत्ता यादीव्यतिरिक्त सारथीच्या गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी ९६०० रुपये शिष्यवृत्ती दिली जाते.

विद्यार्थिनींच्या या उल्लेखनीय यशानिमित्त शाळेत आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी यशस्वी विद्यार्थिनी व मार्गदर्शक



शिक्षक अरविंद राठोड यांचा श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहसचिव (प्रशासन) प्राचार्य सीताराम गवळी व मुख्याध्यापिका संजीवनी बोरकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात विद्यार्थिनींना पेढे वाटून आनंद व्यक्त करण्यात आला.

यावेळी बाळासाहेब दौंडकर यांनी विद्यार्थिनींचे कौतुक करत त्यांना १० हजार रुपयांचे रोख बक्षीस दिले. तसेच विद्यार्थिनींना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमाला केंद्रप्रमुख हिंगणे, शिक्षणप्रेमी जे. पी. नाना कदम, दादा पाटील काळभोर, प्राचार्य मंजुळकर, प्रा. गायकवाड सर, सूर्यवंशी सर, वंदनाताई राजकुमार काळभोर, हर्षदा कुंभारकर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पाटील पी. डी. यांनी केले तर आभार पाटील व्ही. व्ही. यांनी मानले

दरम्यान, विद्यार्थिनींच्या या उज्ज्वल यशामुळे लोणी काळभोर परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून यशस्वी विद्यार्थिनी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

गुणवंत विद्यार्थिनींची नावे समीक्षा सुहास कुंभार (१४३), श्रद्धा उमेश माने (१३६), ज्ञानेश्वरी राहुल चव्हाण (१३६), लक्ष्मी परमेश्वर माने (१२९), श्रेया जितेंद्र खराडे (१२५), हिंदवी राजू ननवरे (१२५), स्वराली नवनाथ बधे (१२३), वैभवी बाळू तावरे (११२), वैष्णवी विठ्ठल कदम (१२२), जिक्राशामुदिन पिरजादे (११९), गौरी पोपट चव्हाण (११९), संस्कृती बंडू विघ्ने (११८), वैष्णवी सुनील कोळपे (११७), सारिका रंगराव येवते (११६), राजश्री संभाजी जायेभाये (११४), वैभवी प्रकाश शिंदे (११३), साक्षी परशुराम कलाल (११२), दीप्ती दत्तात्रय गोडगे (१११), आलिया आरिफ मोगल (११०), सई अनिल गिरी (१०८), जान्हवी मंगेश चव्हाण (१०८), सानिया रियाज शेख (१०७), चेतली चिदानंद स्वामी (१०६), श्रेया सिद्धार्थ येवतीकर (१०५), समीक्षा वैभव व्होनमाने (१०४), सई विशाल काळभोर (१०४), साक्षी भागवत काळे (१०४), सानिध्या विजय काळभोर (१००), जानवी समाधान राऊत (९८), तनिष्का विकास काळभोर (९८), संस्कृती महेश चांदणे (९७), सोनम महादेव भोसले (९६), राजलक्ष्मी धनराज गणदास (९५), तमन्ना जाकीर शेख (९४), पलक नवनाथ मगर (९४), साक्षी राकेश कामठे (९४), मानसी संजय जाधव (९३), गायत्री प्रवीण चव्हाण (९३), श्रुती संजय भांड (९३), सृष्टी राहुल मुळे (९२), अमृता उद्धव सातपुते (९१), पूनम लक्ष्मण काळे (९१), विद्या विजय बच्छिरे (८८), वैष्णवी नवनाथ पावणे (८७), लावण्या लक्ष्मीकांत काळभोर (८७), ऐश्वर्या सुमेध कांबळे (८६), तन्वी शंकर इंदलकर (८६), वर्षा सतिश बिक्कड (८५), रोशनी गजानन उतपुरे (८३), कल्याणी राजेश कुंभारकर (७९), वैष्णवी मोहन काळभोर (७८), ऋतुजा संतोष काळभोर (७७), रिया सुखदेव गळवे (७७) आणि सुप्रिया तुकाराम चव्हाण (७७).

# यवत येथे तीन दिवसीय छावा कीर्तन मालिका; रक्तदान शिबिर व मुक पदयात्रेचे आयोजन

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. १३ : धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान दिनानिमित्त यवत येथे तीन ३ दिवसीय छावा कीर्तन पुष्पांजली मालिका, रक्तदान शिबिर आणि मुक पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. यवत व पंचक्रोशीतील युवकांच्या पुढाकारातून हा उपक्रम होत असून नागरिकांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.

श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान यांच्या वतीने देशभर धर्मवीर बलिदान मास पाळला जात आहे. त्या अनुषंगाने यवत येथे १८ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत विविध धार्मिक-सांस्कृतिक उपक्रम राबविले जात आहेत. या काळात युवक दररोज श्री काळभैरवनाथ मंदिर येथे एकत्र येऊन ध्येय मंत्र, प्रेरणा मंत्र व संभाजी सूर्यहृदय श्लोकांचे सामूहिक पठण



करीत इतिहासाची स्मृती जागवण्याचा प्रयत्न करीत आहेत.

धर्मासाठी प्राणार्पण करणाऱ्या धर्मवीरांना अभिवादन करण्याच्या भावनेतून युवकांनी या महिन्यात साधेपणाने जीवन जगण्याचा संकल्प केला आहे. काहींनी गोड पदार्थांचा त्याग, पादत्राणे न घालणे, जमिनीवर झोपणे अशा कठोर आचारांचे पालन केले असून काहींनी मुंडन करून महाराजांच्या वेदनांची प्रतीकात्मक जाणीव जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. हा उपक्रम केवळ धार्मिक विधी नसून आत्मशुद्धी आणि इतिहासाशी नाळ जोडण्याचा प्रयत्न असल्याची भावना युवकांनी व्यक्त केली.

दरम्यान, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या न निघालेल्या अंत्ययात्रेच्या स्मरणार्थ बुधवारी (ता. १८) सायंकाळी सहा वाजता श्री काळभैरवनाथ मंदिर ते पालखी मार्ग असा मुक पदयात्रेचा कार्यक्रम होणार आहे. या पदयात्रेत यवत व पंचक्रोशीतील सर्व हिंदू बांधव-भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. यवत परिसरातील युवकांच्या सहभागामुळे धर्मवीर बलिदान मास हा श्रद्धा, संयम आणि राष्ट्राभिमानाचा संगम ठरत असून नव्या पिढीला इतिहासाची प्रेरणा देणारा उपक्रम ठरत आहे.

**रक्तदान शिबिर व कीर्तन मालिका**

बलिदान दिनानिमित्त रविवारी (ता. १५) सकाळी ८ ते सायंकाळी५ या वेळेत श्री काळभैरवनाथ मंदिर येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. याच दिवशी रात्री ८ वाजता कीर्तन केसरी ह.भ.प. महेश महाराज मडके (आळंदी) यांचे कीर्तन होणार आहे. सोमवारी (ता. १६) ह.भ.प. गणेश महाराज फरताळे (श्री क्षेत्र वढू) यांचे शिवशंभू व्याख्यान तर मंगळवारी (ता. १७) ह.भ.प. धर्मराज महाराज हांडे (वारजे, पुणे) यांचे शिवकीर्तन आयोजित करण्यात आले आहे.

# व्ही.के. सिंग ब्लॅकबॉक्सच्या FDR मधील माहिती एडीट करतायत; रोहित पवार यांचा आरोप

**मुंबई, ता. १३ :** राज्याचे दिवंगत मुख्यमंत्री अजित पवार यांच्या संशयास्पद विमान अपघातासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार हे गेल्या महिन्या भरापासून आवाज उठवत आहेत. या प्रकरणात बड्या नेत्यांकडून व्हीएसआर कंपनीचे मालक व्ही. के. सिंग यांचा बचाव केला जात असल्याचा आरोप याआधीच रोहित पवार यांनी केला होता. आता याप्रकरणी रोहित पवार यांनी व्ही केसिंग पुराव्यांसोबत छेडछाड करत असल्याचा आरोप केला आहे. व्ही. के सिंग हे ब्लॅकबॉक्सच्या एफडीआर मधील माहिती एडीट करतायत, असा आरोप त्यांनी ट्विटरवरून केला आहे.

फेरफार करण्यात अत्यंत सराईत असलेला VSR कँम्पनीचा मालक



व्ही. के. सिंग सद्यस्थितीला आपल्या मर्जीतील काही अधिकाऱ्यांना हाताशी धरून एफडीआर (balckbox चा एक भाग ज्यामध्ये विमानांची सर्व तांत्रिक माहिती रेकॉर्ड झालेली असते) मधील एडिट करत असल्याची माहिती मिळाली आहे. DGCA किंवा AAIB मधील जे कुणी याकामी मदत करत असतील किंवा करणार असतील त्यांनी षैशपीळल audit मध्ये हा फेरफार पकडला जाईल, याची नोंद असू द्यावी. उद्या आम्ही संसदेच्या माध्यमातून समिती स्थापन केल्यानंतर (जी होणारच आहे) आणि त्यात forensic audit झाले जे होणारच आहे तेंव्हा VSR कंपनीला वाचवायला कुणीही येणार नाही. तसंच DGCA मध्ये अनेक अधिकारी प्रामाणिक देखील आहेत हेही लक्षात असू द्यावं, असा इशारा रोहित पवार यांनी दिला आहे.

गुरुवारी रोहित पवार यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची भेट घेत लोकसभेत आवाज उठवून याबाबत निष्पक्ष चौकशी करण्यास सरकारला भाग पाडा, अशी विनंती केली होती. या संदर्भात त्यांनी दिल्लीत विरोधी पक्षाच्या प्रमुख नेत्यांच्याही भेटी घेतल्या आहेत. आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, खासदार सोनिया गांधी यांचीही भेट घेत रोहित पवार यांनी अजितदादांच्या अपघाताच्या विषयावरही लोकसभेत आवाज उठवण्याची विनंती केली.

# गॅस सिलिंडरच्या प्रश्नावर व्हायरल फोटो पोस्ट करत राऊत यांचा भाजपवर निशाणा

**मुंबई, ता. १३ :** इराण इस्रायल युद्धामुळे देशभरात सिलेंडरचा मोठा तुटवडा झाला आहे. एकीकडे लोक सिलेंडरसाठी मोठ मोठ्या रांगा लावत असताना दुसरीकडे केंद्र सरकारकडून मात्र सिलेंडरचा मुबलक पुरवठा असल्याचा दावा केला जात आहे. या सर्वादरम्यान केंद्रीय मंत्री स्मृती इराणींचा एक फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

तो फोटो शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते, खासदार संजय राऊत यांनी शेअर केला असून




त्यातून भाजपवर निशाणा साधला आहे. या फोटोत स्मृती इराणी सिलेंडरसोबत रस्त्यावर बसल्या असून त्यावर लापता लेडिज असे लिहण्यात आले आहे. या फोटोचा संबंध स्मृती इराणी यांनी काँग्रेसचे सरकार असताना सिलेंडरच्या दरात वाढ झाल्यानंतर केलेल्या आंदोलनाशी आहे. २०११ मध्ये केंद्रात जेव्हा काँग्रेसचे मनमोहन सिंग यांचे सरकार होते तेव्हा भाजपने सिलेंडरच्या वाढत्या दराविरोधात आंदोलन केले होते. या आंदोलनात भाजप नेत्या स्मृती इराणी आघाडीवर होत्या. त्यावेळी स्मृती इराणी सिलेंडर घेऊन रस्त्यावर बसल्या होत्या.

**स्मृती इराणींचे ट्विटही होतेय व्हायरल**


२०११ मध्ये केंद्र सरकारने घरगुती सिलेंडरच्या दरात ५० रुपयांनी वाढ केली होती. त्याबाबत इराणी यांनी ट्विट करत तत्कालिन सरकारवर टीका केली होती. LPG च्या दरात ५० रुपये वाढवले आणि हे स्वत:ला आम आदमी सरकार म्हणतात. अत्यंत लज्जास्पद आहे, असे त्यांनी ट्विट केले होते.

# सिंहगड किल्ल्याचा विकास रायगड व शिवनेरी किल्ल्याच्या धर्तीवर व्हावा : सभापती युवराज काकडे

**थेऊर, ता. १३ :** किल्ले सिंहगड येथील छत्रपती राजाराम महाराज यांच्या ३२६ व्या पुण्यतिथीचा कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थित पार पडला. सिंहगड किल्ल्याचा विकास रायगड व शिवनेरी किल्ल्याच्या धर्तीवर व्हावा. तसेच छत्रपती राजाराम महाराज यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमासाठी वाढीव निधी मिळावा यासाठी, आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटके यांच्या मार्गदर्शनाखाली शासन व जिल्हा परिषद स्तरावर पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही, हवेली पंचायत समितीचे नवनिर्वाचित सभापती युवराज हिरामण काकडे यांनी दिली.

छत्रपती राजाराम महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त सिंहगड किल्ल्यावर आयोजित शासकीय कार्यक्रम भक्तीभाव आणि उत्साहात पार पडला. या वेळी सभापती युवराज काकडे यांच्या हस्ते महाराजांच्या समाधीस्थळावर पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी काकडे बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या रुपाली कोंडे, पंचायत समिती सदस्या शुभांगी खिरीड, सदस्य युवराज वांजळे, गटविकास अधिकारी शेखर शेलार, इतिहास संशोधक नंदकुमार मते, माजी पंचायत समिती सदस्य दत्तात्रय घोरपडे, मोडी लिपी अभ्यासक अशोक पाटील, प्रा. देशमुख, नगरसेवक सचिन दोडके, अमित गायकवाड तसेच ढमढेरे परिवारासह स्थानिक पदाधिकारी, शिवप्रेमी, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यापुढे बोलताना काकडे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांचे सुपुत्र आणि मराठा साम्राज्याचे तिसरे छत्रपती असलेल्या राजाराम महाराजांनी मुघलांविरुद्धच्या संघर्षाच्या कठीण काळात स्वराज्य टिकवण्यासाठी मोठा लढा दिला. त्यांचे निधन ३ मार्च १७०० रोजी सिंहगड किल्ला येथे झाले. त्यानिमित्त दरवर्षी येथे पुण्यतिथीनिमित्त श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित केला जातो.

दरम्यान, यावेळी उपस्थित मान्यवरांनी छत्रपती राजाराम महाराज यांच्या कार्याचा गौरव करत स्वराज्य टिकवण्यासाठी त्यांनी दिलेल्या ऐतिहासिक योगदानाची आठवण करून दिली. शिवभक्त व नागरिकांनीही महाराजांच्या समाधीस्थळी अभिवादन करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. उपस्थितांनी स्वराज्याच्या इतिहासाची आठवण करून देत छत्रपती राजाराम महाराजांच्या आदर्शावर चालण्याचा संकल्प यावेळी व्यक्त केला.

## संक्षिप्त

### पिंपरी-चिंचवडमध्ये अभियंता महिलेची ३१ लाखांची फसवणूक

**पिंपरी, ता. १३ :** विवाह जुळविणाऱ्या संकेतस्थळावरून ओळख वाढवून लग्नाचे आमिष दाखवत एका अभियंता महिलेची तब्बल ३१ लाख २० हजार २५७ रुपयांची फसवणूक करण्यात आली. ही घटना चिंचवड परिसरात ऑनलाईन माध्यमातून घडली. या प्रकरणात एका पीडित महिलेने चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यातील एका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित महिला अभियंता असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन करून वेगवेगळ्या कारणांसाठी पैशांची मागणी केली. त्याने फिर्यादीला एका बँकेतून ऑनलाइन कर्ज घेण्यास भाग पाडले. या कर्जाचे हप्ते भरण्याची जबाबदारी स्वतःवर घेऊनही त्याने पैसे न भरता फिर्यादीची आर्थिक फसवणूक केली. चिंचवड पोलीस तपास करत आहेत.

### ताथवडे येथे कामगार वसाहतीमध्ये एकावर कोयत्याने वार

**पिंपरी, ता. १३ :** बांधकाम प्रकल्पावरील भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या मजूर वसाहतीमधील प्रमुखावर फावड्याने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना ताथवडे येथे घडली. या प्रकरणी अभिजीत अशोक पिसाळ (३६, दत्तवाडी, आकुर्डी) यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दीपक रॉय, अब्दुल कलीम आणि मोहम्मद सलीम यांना अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मजूर वसाहतीमधील प्रमुख म्हणून काम करणारे दोघे भांडण करणाऱ्या कामगारांना कॅम्प सोडून जाण्यास सांगण्यासाठी गेले होते. त्याचा राग आल्याने आरोपींनी फावड्याने बेदम मारहाण केली. या हल्ल्यात सूरजचे नाक आणि ओठ कापले गेले असून जबडा आतून फाटल्याने तो गंभीर जखमी झाला आहे. वाकड पोलीस तपास करत आहेत.

### गांजा विक्री प्रकरणी दोघांना अटक

**निगडी, ता. १३ :** अंमली पदार्थ विरोधी पथकाने कारवाई करत दोघांना गांजा विक्री प्रकरणात अटक केली. ही कारवाई गुरुवारी (ता. १२) तळवडे येथे करण्यात आली. या प्रकरणी पोलीस शिपाई प्रतीक कवडे यांनी चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी राजेंद्र सुरेश पवार (२६, निगडी) आणि बळीराम मोहिते यांना अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी राजेंद्र पवार याच्याकडे ४४६ ग्रॅम वजनाचा गांजा, एक मोबाईल आणि एक मोटार मिळून आली. पोलिसांनी अधिक चौकशी केली असता त्याने हा गांजा बळीराम मोहिते याच्याकडून विक्रीसाठी आणल्याचे कबूल केले. पोलिसांनी आरोपींकडून एकूण आठ लाख ३२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

### काम करत नसल्याने भावावर चाकूने हल्ला

**चाकण, ता. १३ :** काहीही काम करत नाही आणि मद्यपान करतो या कारणावरून झालेल्या वादातून मोठ्या भावाने लहान भावाच्या बरगडीत चाकूखुपसून जखमी केले. ही घटना चाकण येथे घडली. या प्रकरणात लहान भावाने उत्तर चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी त्यांच्या मोठ्या भावावर गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घरातील लोक जेवणासाठी पोहे बनवण्यासाठी कांदा कापत असताना आरोपी आणि फिर्यादी यांच्यात कामावरून वाद झाला. संतापलेल्या आरोपीने हातातील कांदा कापायच्या चाकूने भावाच्या डाव्या बरगडीवर वार करून त्यांना जखमी केले.

# नवले पूल परिसरात भरधाव ट्रकची सहा वाहनांना धडक ; दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पुणे, ता. १३ :** मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावर नवले पूल परिसरात शुक्रवारी एका भरधाव ट्रकने सिग्नलला थांबलेल्या वाहनांना धडक दिली. अपघातात दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाला. अपघातात वाहनांचे नुकसान झाले. जोरदार धडक दिली.

नवले पुलाजवळ असलेल्या सिग्नलच्या परिसरात सकाळी साडेसहाच्या सुमारास अपघाताची घटना घडली. सिग्नल वाहने थांबले होती. त्या वेळी कात्रज बोगद्याकडून येणाऱ्या भरधाव ट्रक चालकाचे नियंत्रण सुटले. तीव्र उतारावर एकापाठोपाठ वाहनांना धडक दिली. ट्रकने एका दुचाकीस्वाराला धडक दिली. अपघातात त्याचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच नागरिकांसह, पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सिंहगड रस्ता पोलिसांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. अपघातग्रस्त वाहने बाजूला काढण्यात आली. अपघातानंतर काही काळ या भागातील वाहतूक विस्कळीत झाली.

मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावर होणारे गंभीर अपघात रोखण्यासाठी नवीन कात्रज बोगदा ते नवले पूल दरम्यान असलेल्या सात किलोमीटरच्या अंतरात अवजड वाहनांसाठी वेगमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. मात्र, अवजड वाहनचालकांकडून सर्रास नियम धुडकाविण्यात येत असल्याचे दिसून आले आहे. नवले पुलावर



१३ नोव्हेंबररोजी साताऱ्याकडून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या कंटेनर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. या कंटेनरने १० ते १२ वाहनांना धडक दिल्यामुळे लागलेल्या आगीत आठ जणांचा होरपळून मृत्यू झाला.

अपघातात नऊ ते दहा जण गंभीररीत्या जखमी झाले. मुंबई-बंगळुरु बाह्यवळण मार्गावर नवले पूल परिसरात घडलेल्या गंभीर स्वरूपाचे अपघात यापूर्वी घडले आहे. बाह्यवळण मार्गावर नवीन कात्रज बोगदा ते नवले पूल परिसर सात किलोमीटर अंतर तीव्र उताराचा आहे. त्यामुळे या भागात भरधाव अवजड वाहनांचे ब्रेक निकामी होऊन गंभीर अपघात घडले आहेत. नवले पूल परिसरात झालेल्या गंभीर अपघातांची दखल घेऊन वाहतूक पोलीस, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, महापालिकेने एकत्र येऊन या भागातील अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या होत्या. नवले पूल परिसरात झालेल्या अपघातांत अनेक बळी गेले आहेत.

नवले पूल परिसरात झालेल्या भीषण अपघाताच्या पार्श्वभूमीवर या भागात होणारे अपघात रोखण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करण्याची गरज आहे. आपत्कालीन उपाययोजनासंदर्भात विविध यंत्रणांशी समन्वय साधण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. नऱ्हे ते रावेत (सुतारवाडीमार्गे) दरम्यान उन्नत पुलाचा प्रकल्प आराखडा मंजूर झाला आहे. त्यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केला जाणार आहे, अशी माहिती खासदार, केंद्रीय नागरी विमान उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली होती.

# पुण्यात मांजर, पोपटावरून दोन शेजाऱ्यांमध्ये तुफान हाणामारी

**पुणे, ता. १३ :** पुण्यातील ताडीवाला रोड परिसरात किरकोळ कारणावरून दोन शेजाऱ्यांमध्ये झालेला वादथेटपोलिसठाण्यापर्यंतपोहोचल्याची घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे या वादाचे कारण ठरले ते एका घरातील पोपट आणि दुसऱ्या घरातील मांजर. या किरकोळ कारणावरून सुरू झालेल्या वादाचे रूपांतर अखेर मारहाणीमध्ये झाले असून पोलिसांनी मांजरीच्या मालकाविरोधात गुन्हा नोंदवला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, ताडीवाला रोड परिसरातील भारत तरुण मंडळाजवळ अभिषेक सिंग हे आपल्या कुटुंबासह राहतात. त्यांनी आपल्या घरात पोपट पाळला असून त्याचा पिंजरा घरासमोर ठेवलेला असतो. त्यांच्या शेजारी राहणारे दिनेश रंगराव पोताबत्तोनी यांनी मांजर पाळले आहे. ही मांजर परिसरात मोकळेपणाने फिरत असल्याने ती वारंवार सिंग यांच्या घरासमोर येऊन पोपटाच्या पिंजऱ्याजवळ चाळे करत असल्याचे सांगितले जाते.

काही वेळा या मांजरीने पोपटाचा पिंजरा ढकलल्याचीही घटना घडल्याने सिंग यांना त्याचा त्रास होत होता. त्यामुळे त्यांनी शेजारी दिनेश पोताबत्तोनी यांना मांजरीवर लक्ष ठेवण्यास सांगितले. मात्र या मुद्द्यावरून दोघांमध्ये वाद सुरू झाला. सुरुवातीला तोंडी वाद झाला, पण काही वेळातच दोन्ही कुटुंबातील सदस्य यात सहभागी झाल्याने परिस्थिती अधिक चिघळली. वाद वाढत गेल्यानंतर दोन्ही बाजूंचे लोक घराबाहेर येऊन एकमेकांशी शिवीगाळ आणि धक्काबुक्की करू लागले. काही क्षणांतच हा वाद हाणामारीपर्यंत पोहोचला. या मारहाणीत अभिषेक सिंग यांना दुखापत झाल्याची माहिती समोर आली आहे.

घटनेनंतर अभिषेक सिंग यांनी पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी या तक्रारीची दखल घेत मांजरीचे मालक दिनेश रंगराव पोताबत्तोनी यांच्याविरोधात गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, एका मांजर आणि पोपटामुळे शेजाऱ्यांमध्ये एवढा मोठा वाद झाल्याची चर्चा परिसरात रंगली असून किरकोळ कारणांवरून वाढणारे वाद कसे गंभीर स्वरूप धारण करू शकतात, याचे हे उदाहरण ठरत आहे.

# इराण लवकरच शरणागती पत्करेल : ट्रम्प यांचा मोठा दावा

**नवी दिल्ली, ता. १३ :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी G-७ देशांच्या नेत्यांसोबत झालेल्या एका महत्त्वाच्या बैठकीत पश्चिम आशियातील तणावावर भाष्य करताना खळबळजनक दावा केला आहे. इराण आता दबावाखाली असून तो लवकरच शरणागती पत्करेल, असे विधान ट्रप यांनी केले आहे. या विधानामुळे जागतिक राजकारणात नव्या चर्चेला उधाण आले आहे.

काय म्हणाले डोनाल्ड ट्रम्प? G-७ राष्ट्रांच्या प्रमुखांशी संवाद साधताना ट्रम्प म्हणाले की, इराणची सध्याची आर्थिक आणि राजकीय स्थिती अत्यंत नाजूक आहे. अमेरिकेने आखलेली रणनीती आणि सातत्याने वाढणारा आंतरराष्ट्रीय दबाव यामुळे इराणला आता नमते घेण्याशिवाय दुसरा पर्याय उरलेला



नाही. इराण लवकरच चर्चेसाठी तयार होईल आणि शरणागती पत्करेल, याची मला खात्री आहे.

या बैठकीत प्रामुख्याने इस्त्रायल आणि इराण दरम्यान सुरू असलेला संघर्ष आणि त्याचे जागतिक अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम यावर सविस्तर चर्चा झाली. ट्रम्प यांनी जागतिक नेत्यांना आश्वस्त केले की, अमेरिका या भागातील शांततेसाठी कटिबद्ध आहे. मात्र इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमाला आणि त्यांच्या आक्रमक धोरणांना लगाम घालणे हे आमचे प्राथमिक ध्येय आहे.

# पुण्यात मद्यपान करून गाडी चालवल्यास ड्रायव्हिंग लायसन्सही होणार रद्द

**पुणे, ता. १३ :** पुण्यात मद्यपान करून वाहन चालवण्याच्या प्रकारात चिंताजनक वाढ दिसून येत आहे. वाहतूक पोलिसांनी यावर्षी जानेवारीपासून आतापर्यंत २००० पेक्षा अधिक मद्यपी वाहनचालकांवर कारवाई केली असली तरी काही जण पुन्हा त्याच गुन्ह्याची पुनरावृत्ती करत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे आता अशा चालकांविरोधात अधिक कठोर कारवाई करण्याचा निर्णय पुणे वाहतूक पोलिसांनी घेतला आहे. दुसऱ्यांदा मद्यपान करून वाहन चालवताना आढळलेल्या चालकांचा ड्रायव्हिंग लायसन्स रद्द करण्यासोबतच त्यांना न्यायालयीन प्रक्रियेनंतर कारागृहात पाठवण्याची तयारी पोलिसांनी दर्शवली आहे.




पुणे शहरात गेल्या वर्षी तब्बल ६७०० मद्यपी वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली होती. त्यापैकी ६७ जण पुन्हा मद्यपान करून वाहन चालवताना पकडले गेले. या चालकांचे परवाने रद्द करण्यात आले आणि काही प्रकरणांमध्ये न्यायालयाने कारावासाची शिक्षा देखील सुनावली. यंदाच्या वर्षातही अशा प्रकारची पुनरावृत्ती दिसून येत असून आतापर्यंत १४ जण दुसऱ्यांदा मद्यपान करून वाहन चालवताना आढळले आहेत. त्यांच्या विरोधातही कठोर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे.

दरम्यान, शहरात ६ ते ८ मार्च दरम्यान वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम राबवली. शहरातील प्रमुख रस्त्यांवर सुमारे ३० ठिकाणी नाकाबंदी करून ब्रेथ ॲनालायझरच्या साहाय्याने वाहनचालकांची तपासणी करण्यात आली. या मोहिमेत १८९ चालक मद्यपान करून वाहन चालवत असल्याचे आढळले. पकडलेल्या चालकांचे ११ मार्च रोजी येरवडा येथील वाहतूक शाखेच्या कार्यालयात समुपदेशन करण्यात आले. या कार्यक्रमाला १३५ जण उपस्थित होते. समुपदेशनादरम्यान मद्यपान करून वाहन चालवण्याचे गंभीर परिणाम, अपघातांचा धोका आणि कायदेशीर शिक्षा याबाबत माहिती देण्यात आली.

वाहतूक तज्ज्ञांच्या मते, मद्यपान केल्यानंतर वाहन चालवल्यास चालकाचे नियंत्रण कमी होते आणि गंभीर अपघात होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे केवळ शहरातील रस्त्यांवरच नव्हे तर राष्ट्रीय आणि राज्य महामार्गांवरही अशा मोहिमा अधिक तीव्र करण्याची गरज व्यक्त केली जात आहे. नियमांचे काटेकोर पालन केल्यास अपघातांचे प्रमाण कमी होऊ शकते, असा विश्वास तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

# अजितदादांच्या अपघाताचा पुरावाच मिटवला जातोय? रोहित पवारांचा आरोप

**पुणे, ता. १३ :** अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या प्रकरणात आता नव्या वादाला तोंड फुटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी या अपघाताशी संबंधित ब्लॅकबॉक्स मधील माहितीमध्ये छेडछाड होत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. त्यांनी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत हा दावा मांडला असून त्यामुळे या प्रकरणाची चौकशी आणि पारदर्शकतेबाबत नवे प्रश्न उपस्थित झाले आहेत.

रोहित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, व्हीएसआर कंपनीचा मालक व्ही. के. सिंग हा काही अधिकाऱ्यांना हाताशी धरून ब्लॅकबॉक्समधील महत्त्वाच्या माहितीमध्ये फेरफार करत असल्याची माहिती मिळत आहे. ब्लॅकबॉक्समधील एफडीआर म्हणजे फ्लाइट डेटा रेकॉर्डर हा विमानातील सर्व तांत्रिक माहिती नोंदवणारा महत्त्वाचा भाग असतो. विमानाचा वेग, उंची, इंजिनची स्थिती, पायलटचे नियंत्रण यासारखी अनेक संवेदनशील माहिती त्यामध्ये नोंदलेली असते. विमान अपघाताच्या चौकशीत या डेटाला अत्यंत महत्त्व असते.



रोहित पवार यांनी पुढे असा इशाराही दिला आहे की, नागरी विमान वाहतूक महासंचालनालय किंवा विमान अपघात तपास संस्था मधील कोणीही अधिकारी या प्रक्रियेत मदत करत असेल तर फॉरेन्सिक ऑडिटमध्ये हा फेरफार उघड होऊ शकतो. त्यांनी स्पष्ट केले की भविष्यात संसदेच्या माध्यमातून या प्रकरणाची स्वतंत्र समिती स्थापन केली जाईल आणि त्यानंतर फॉरेन्सिक ऑडिट होणारच आहे. अशा वेळी व्हीएसआर कंपनीला कोणीही वाचवू शकणार नाही, असेही त्यांनी पोस्टमध्ये नमूद केले.

विमान अपघातांच्या चौकशीत ब्लॅकबॉक्स हा सर्वात विश्वासार्ह पुरावा मानला जातो. त्यामुळे त्यामधील डेटामध्ये छेडछाड झाल्याचा आरोप अत्यंत गंभीर मानला जात आहे. या आरोपांनंतर संबंधित संस्थांकडून अधिकृत प्रतिक्रिया येण्याची शक्यता आहे. दरम्यान, रोहित पवारांच्या या पोस्टमुळे राजकीय वर्तुळात तसेच विमान सुरक्षेशी संबंधित क्षेत्रात मोठी चर्चा सुरू झाली आहे. आता या आरोपांवर संबंधित यंत्रणा आणि कंपनी काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आळंदीतील शिक्षण संस्थेतील मुलाच्या अंगावरील वळ पाहून पोलीसही चक्रावले

**आळंदी, ता. १३ :** तीर्थक्षेत्र आळंदी येथील खंडोबा मंदिर परिसरातील एका 'आध्यात्मिक' शिक्षण संस्थेत बालकांचे शारीरिक, मानसिक आणि लैंगिक शोषण होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. प्रशासनाने धाड टाकून २१ निरागस मुलांना तातडीने सुटका केली आहे. ही घटना आळंदी परिसरात धक्कादायक ठरली आहे आणि स्थानिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.



घटनेची माहिती 'चिल्ड्रन हेल्पलाईन १०९८' वरून मिळालेल्या गोपनीय तक्रारीवरून मिळाली. त्यानंतर जिल्हा बाल संरक्षण कक्ष आणि पोलिसांनी तत्परतेने या संस्थेवर कारवाई केली. तपासणी दरम्यान, एका १३ वर्षीय मुलाच्या अंगावर मारहाणीच्या गंभीर खुणा आढळल्या, ज्यातून संस्थेतील अमानवीय कृत्यांचा उघडेपणा झाला. मुलांकडून सक्तीने कामे करवणे, मारहाण करणे आणि लैंगिक शोषण करणे या सर्व प्रकारांवर तपासणी करतांना बालकांचे रक्षण करण्यासाठी तातडीचे पाऊल उचलण्यात आले.

बालकल्याण समितीच्या आदेशानंतर, बालस्नेही टास्क फोर्स आणि आळंदी पोलिसांनी २१ मुलांना सुरक्षित शासकीय बालगृहात हलवले. या प्रकरणातील आरोपींविरुद्ध आळंदी पोलीस ठाण्यात गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलीस सध्या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. स्थानिकांमध्ये ही घटना ऐकून संताप आणि भीतीचे वातावरण पसरले असून, प्रशासन आणि पोलिसांनी पुढील कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. मुलांच्या सुरक्षेसाठी प्रशासनाने जागरूकता वाढविण्यावर भर दिला असून, भविष्यात अशा घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत.

# एलपीजी सिलिंडर टंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांची मोठी घोषणा

**पुणे, ता. १३ :** सध्या एलपीजी सिलिंडरची टंचाई सुरू असून त्यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. घरगुती गॅस सिलिंडर व्यावसायिक वापराचा गॅस सिलिंडर आणि उद्योगासाठींचे गॅस सिलिंडर मिळत नसल्याचे चित्र आहे. पुण्यासारख्या शहरात हॉटेल आणि खानावळ बंद पडू लागल्याने विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी मोठी घोषणा करत सिलिंडर वाटपाचा प्राधान्यक्रम जाहीर केला आहे. यामुळे सर्वात अडचणीत आलेल्या घटकांना तातडीने सिलिंडर उपलब्ध होणार आहे.



पुणे जिल्ह्यात घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांना त्याचा पुरवठा नियमितपणे केला जात आहे. त्यामुळे गॅस टंचाईबाबत पसरवल्या जाणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे. जिल्हाधिकारी म्हणाले की, जिल्ह्यातील रुग्णालये, आरोग्य संस्था, आपत्कालीन सेवा तसेच विद्यार्थ्यांच्या शासकीय वसतिगृहांना गॅस सिलिंडरचा पुरवठा प्राधान्याने करण्यात यावा, अशा स्पष्ट सूचनाही प्रशासनाकडून संबंधित वितरक आणि तेल कंपन्यांना देण्यात आल्या आहेत. या अत्यावश्यक सेवांमध्ये कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी प्रशासन विशेष लक्ष ठेवून आहे.

**पुरेसा साठा उपलब्ध**

अलीकडील काही दिवसांत समाज माध्यमावर तसेच विविध माध्यमांमधून गॅस टंचाईबाबत चर्चा सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने याबाबत स्पष्टीकरण दिले आहे. जिल्ह्यातील सर्व एलपीजी वितरक तसेच प्रमुख तेल कंपन्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांना नियमितपणे सिलिंडरचा पुरवठा केला जात आहे. त्यामुळे जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची टंचाई निर्माण झालेली नाही, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

**कठोर कारवाईचे निर्देश**

जिल्हा प्रशासन तसेच जिल्हा पुरवठा विभागामार्फत गॅस वितरण व्यवस्थेवर सातत्याने देखरेख ठेवली जात आहे. यासाठी जिल्हास्तर आणि तालुकास्तरावर विशेष फिरती व दक्षता पथके गठित करण्यात आली असून ती विविध गॅस एजन्सी, गोदामे तसेच वितरण केंद्रांची तपासणी करत आहेत. या पथकांमार्फत गॅस सिलिंडरचा साठा, वितरणाची प्रक्रिया तसेच ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या सेवांची नियमित पडताळणी केली जात आहे. कोणत्याही वितरकाकडून कृत्रिम टंचाई निर्माण करणे, गॅस सिलिंडर जादा दराने विक्री करणे, साठेबाजी करणे किंवा इतर कोणतीही अनियमितता आढळल्यास संबंधितांविरुद्ध अत्यावश्यक वस्तू कायद्याअंतर्गत कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही जिल्हाधिकारी डुडी यांनी दिला आहे.

# खंडाळा घाटात कंटेनर पलटी झाल्याने वाहतूक ठप्प



**लोणावळा, ता. १३ :** मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील खंडाळा घाटात शुक्रवारी सकाळी एक अपघात घडला. अमृत अंजन पुलाजवळील तीव्र उतार आणि वळणावर मासे वाहतूक करणाऱ्या कंटेनरचे ब्रेक निकामी झाल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कंटेनर रस्त्यावर उलटला. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र चालक आणि त्याचा सहायक किरकोळ जखमी झाले आहेत. हा अपघात सकाळी सुमारे ६.३० वाजण्याच्या सुमारास घडला.

अपघातामुळे काही काळ मुंबईकडे जाणारी वाहतूक विस्कळीत झाली होती. मात्र बोरघाट दस्तुरी म हामार्ग पोलिस आणि संबंधित यंत्रणांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अपघातग्रस्त कँटेनर बाजूला करण्यासाठी युद्धपातळीवर काम करण्यात आले आणि सुमारे अर्ध्या तासात वाहतूक पुन्हा सुरळीत करण्यात आली.

महामार्ग पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आंध्र प्रदेश येथून मुंबईकडे मासे घेऊन जाणारा कँटेनर (क्रमांक AP-१६/TF-३३७९) अमृत अंजन पुलाजवळील उतारावर येत असताना त्याचे ब्रेक निकामी झाले. त्यामुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कँटेनर रस्त्यावर उलटला. या अपघातात चालक आणि त्याचा सहायक किरकोळ जखमी झाले असून त्यांना तातडीने उपचारासाठी पाठवण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच बोरघाट दस्तुरी महामार्गाचे सहायक पोलिस निरीक्षक स्वप्निल पाटील यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. आयआरबी पेट्रोलिंग, महामार्ग वाहतूक पोलीस, डेल्टा फोर्स महाराष्ट्र सुरक्षा बल तसेच मृत्युंजय देवदूत आपत्कालीन पथकाच्या मदतीने क्रेनच्या सहाय्याने कंटेनर रस्त्याच्या बाजूला करण्यात आला. दरम्यान, कंटेनरमधून गळती झालेल्या ऑईलवर माती टाकून ते पाण्याने स्वच्छ करण्यात आले. त्यामुळे रस्ता पुन्हा सुरक्षित करून वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पुण्याहून मुंबईकडे जाणारी वाहतूक काही काळ वलवण एक्झिट येथून जुन्या मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर वळवण्यात आली होती.

# पुणे रिंग रोडच्या कामात विलंब झाल्याने कंत्राटदारांना रोज सव्वा कोटी दंड?

**पुणे, ता. १३ :** पुणे शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी उभारण्यात येत असलेल्या रिंग रोड प्रकल्पाच्या कामात पूर्व भागात मोठा विलंब झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ ने संबंधित कंत्राटदार कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. कामाचा वेग अत्यंत मंद असल्याने दररोज १.२५ कोटी दंड का आकारू नये, असा सवाल करत कंपनीकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे.




पुणे महानगर क्षेत्रातील वाढती वाहतूक लक्षात घेऊन हा महत्त्वाकांक्षी रिंग रोड प्रकल्प उभारण्यात येत आहे. शहराभोवती सुमारे १७० किमी लांबीचा हा मार्ग तयार होत असून तो पूर्व आणि पश्चिम अशा २ प्रमुख भागांत विभागण्यात आला आहे. पश्चिम भागातील काम तुलनेने वेगाने सुरू असताना पूर्वेकडील काही टप्प्यांमध्ये मात्र प्रगती अपेक्षेपेक्षा खूपच कमी आहे.

सध्या पश्चिम भागातील रिंग रोडचे ५ टप्प्यांमध्ये, तर पूर्व भागातील काम ४ टप्प्यांमध्ये सुरू आहे. रहाटणी जवळील कल्याण परिसरात उभारला जाणारा दुहेरी बोगदा या प्रकल्पातील महत्त्वाचा भाग मानला जातो. या बोगद्याचे दोन्ही बाजूंनी मिळून सुमारे २.५ किमी पर्यंत खोदकाम पूर्ण झाले आहे. मुंबईहून साताऱ्याकडे जाणाऱ्या बाजूचा १४११ मीटर, तर कल्याणकडील बाजूचा १४२८ मीटर इतका भाग पूर्ण झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. बोगद्याच्या आतील भागात शॉटक्रीटचे कामही काही प्रमाणात पूर्ण झाले आहे.

एकूणच पाहता पश्चिम भागातील रिंग रोडचे सुमारे २५ टक्के काम पूर्ण झाले आहे. मात्र पूर्वेकडील प्रकल्पाची प्रगती केवळ १२ ते १५ टक्क्यांपर्यंत मर्यादित आहे. विशेषतः चाकण आणि तलेगाव दाभाडे परिसरातील पहिला आणि तिसरा टप्पा अत्यंत संथ गतीने सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे.

या दोन्ही टप्प्यांसह पश्चिमेकडील पहिल्या टप्प्याचे कंत्राट एका मोठ्या कंपनीकडे आहे. सध्याच्या प्रगतीचा आढावा घेतल्यानंतर प्रकल्पात जवळपास ३ महिन्यांचा विलंब झाल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे कामाचा वेग तातडीने वाढवावा, अन्यथा करारातील अटींनुसार आर्थिक दंड लागू केला जाईल, असा इशारा एमएसआरडीसीने दिला आहे.

रिंग रोड प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पुण्यातील शहरातील वाहतूक मोठ्या प्रमाणात बाहेर वळवणे शक्य होईल. त्यामुळे औद्योगिक भाग, महामार्ग आणि उपनगरांमधील प्रवास वेळ कमी होण्याची अपेक्षा आहे. मात्र कामात होणारा विलंब कायम राहिला, तर शहराच्या वाहतूक नियोजनावर त्याचा मोठा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे आता कंत्राटदार कंपनीकडून येणाऱ्या स्पष्टीकरणाकडे आणि पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पुण्यात सापडले १ कोटी ८० लाखांचे ड्रग्ज

**पुणे, ता. १३ :** पुणे जिल्ह्यातील औद्योगिक पट्टा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सणसवाडी परिसरात सीम ाशुल्क विभागाने अमली पदार्थांच्या विरोधात मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत सुमारे १ कोटी ७९ लाख रुपये किमतीचे मेफेड्रॉन जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणात एका संशयित तस्कराला अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. कुरकुंभ येथे उघड झालेल्या ड्रग्ज प्रकरणानंतर पुणे ग्रामीण भागात झालेली ही मोठी कारवाई मानली जात आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, सीमाशुल्क विभागाच्या अमली पदार्थविरोधी पथकाला गुप्त माहिती मिळाली होती. या माहितीनुसार सणसवाडी येथील एका सोसायटीतील फ्लॅटवर अचानक छापा टाकण्यात आला. तपासणीदरम्यान या फ्लॅटमधून ८९८ ग्रॅम ९४ मिलीग्रॅम मेफेड्रॉन आढळून आले. या अमली पदार्थाची बाजारातील किंमत सुमारे १ कोटी ७९ लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले.

या प्रकरणी राजस्थानमधील जोधपूर येथील सागरमल उर्फ सागर बिश्नोई (वय २६) याला अटक करण्यात आली आहे. तो सणसवाडी येथील फ्लॅटमध्ये भाड्याने राहत होता. पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार तो याच ठिकाणावरून पुणे जिल्ह्यातील औद्योगिक भागात ड्रग्जचा पुरवठा करत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

सीमाशुल्क विभागाचे अधिकारी महेंद्र पांचाल यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. आरोपीविरोधात अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायालयात झालेल्या सुनावणीत सरकारी पक्षाने या प्रकरणात मोठ्या रॅकेटचा संबंध असण्याची शक्यता व्यक्त केली आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ पुण्यात कसे आले आणि यामागे आंतरराज्य टोळी आहे का, याचा तपास करण्याची गरज असल्याचेही सांगण्यात आले.

दरम्यान, न्यायालयाने आरोपीला पुढील तपासासाठी पोलीस कोठडी सुनावली आहे. औद्योगिक भागात तरुणांना नशेच्या जाळ्यात ओढणाऱ्या तस्करांवर झालेल्या या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणाचा तपास पुढे सुरू आहे.

# युद्धजन्य परिस्थितीमुळे संकटातील उद्योजकांना बळ द्या : आमदार महेश लांडगे

**पिंपरी-चिंचवड, ता. १३ :** आंतरराष्ट्रीय पातळीवरील युद्धजन्य परिस्थितीमुळे उद्योजकांना गंभीर आर्थिक संकटाचा सामना करावा लागेल. इराण, इस्त्राईल आणि अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या संघर्षामुळे कच्चा माल, इंधन आणि गॅस पुरवठ्यावर परिणाम होत आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवडसह चाकण औद्योगिक पट्ट्यातील लघु उद्योजक मोठ्या संकटात आहेत. यासाठी राज्य व केंद्र सरकारने ठोस उपायोजना कराव्यात, अशी मागणी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केली.



> लघु उद्योजक हे आपल्या राज्य आणि देशाच्या अर्थव्यवस्थेचा पाया आहेत. आंतरराष्ट्रीय युद्धजन्य परिस्थितीमुळे सध्या त्यांना मोठे आव्हान आहे. पण, केंद्र आणि राज्य सरकारच्या संयुक्त प्रयत्नांनी त्यांना संकटातून बळकट करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. कर सवलत, अनुदान, कर्ज सुलभता आणि इंधन-गॅस पुरवठा यांसारख्या उपायांनी उद्योग टिकतील, रोजगार राहतील आणि महाराष्ट्राचा आर्थिक विकास चालू राहील. भाजपा महायुती सरकारच्या माध्यमातून संकटात सापडलेल्या उद्योजकांना दिलासा मिळेल, असा विश्वास आहे.
>
> - **महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

महाराष्ट्र विधिमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन च्या माध्यमातून आमदार लांडगे यांनी उद्योजकांच्या समस्यांकडे लक्ष वेधले. लघु उद्योजकांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी तातडीने उपाययोजना केल्या जाव्यात. कारण, उद्योजक बंद पडतील, अशी भिती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे उद्योजकांना कर सवलत, अनुदान, आणि आर्थिक मदत यांसारख्या उपायांनी उद्योगांना बळ द्यावे, अशी सूचना आमदार लांडगे यांनी केली.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, युद्धजन्य परिस्थितीमुळे पिंपरी-चिंचवडसह चाकण औद्योगिक क्षेत्रातील अनेक कँम्न्यायापरिस्थितीत त्यांच्या उत्पन्नावर गंभीर परिणाम सहन करीत आहेत. आंतरराष्ट्रीय परिस्थिती युद्धजन्य असल्यामुळे गॅस आणि कच्चा मालाचा पुरवठा बंद झाला आहे. त्यामुळे उत्पादन ठप्प झाले आहे. व्यावसायिक गॅस सिलेंडरसुद्धा तुटवडा आहे. ल्युमि निअम आणि कॉपरसह इतर धातुंचा पुरवठा बंद झाला आहे. त्यामुळे उद्योजक हवालदिल झाले आहेत.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

पुणे प्राईम न्यूज
http://www.puneprimenews.com

प्राईम लाईफ



# उन्हाळ्यात चेहऱ्यावर काळे डाग दिसत असतील तर सफरचंदाचा असा करा वापर

उन्हाळ्यात आपल्या त्वचेची काळजी घेणे हे खूप गरजेचे आहे. उष्णतेमुळे त्वचेवर अनेकदा मुरमांची संख्या वाढू लागते अशावेळी कोणता उपाय करावा हे सूचत नाही. म्हणूनच खासकरून उन्हाळात फळांचा वापर हा त्वचेसाठी खूप महत्त्वाचा मानला जातो. फळांपासून केलेले उपाय हे चेहऱ्यासाठी फार फायदेशीर ठरतात.

खासकरून नैसर्गिक उपाय केवळ चेहऱ्यावर चमक आणत नाहीत तर त्वचेच्या समस्यांपासूनही आराम देतात. घरगुती उपचारांचा सर्वात मोठा फायदा म्हणजे त्यांचे कोणतेही दुष्परिणाम नाहीत. त्याचप्रमाणे, सफरचंद आणि कच्च्या दुधापासून एक फेसपॅक करणे अतिशय सोपे काम आहे.

सफरचंदांमध्ये आढळणारे अँटीऑक्सिडंट्स त्वचेला तरुण ठेवण्यास मदत करू शकतात. दुसरीकडे, कच्च्या दुधात लॅक्टिक ॲसिड आणि व्हिटॅमिन ए जास्त प्रमाणात आढळते, यामुळे सुरकुत्याच्या समस्येपासून मुक्त होण्यास मदत करू शकते.

त्वचेवर नैसर्गिक चमक आणण्यासाठी सफरचंद आणि कच्च्या दुधाचा फेस पॅक फायदेशीर मानला जातो. त्यात अँटीऑक्सिडंट्ससोबतच आवश्यक जीवनसत्त्वे देखील आढळतात. कच्च्या दुधात एक्सफोलिएटिंग गुणधर्म आढळतात, जे त्वचेवरील मृत त्वचा काढून टाकण्यासाठी फायदेशीर ठरू शकतात.

उन्हाळ्यात आपल्या त्वचेलाही हायड्रेशनची आवश्यकता असते. दूध आणि सफरचंद दोन्ही त्वचेला हायड्रेट ठेवण्यासाठी फायदेशीर मानले जातात, म्हणून हा फेसपॅक त्वचेला हायड्रेट ठेवण्यास मदत करू शकतो. सफरचंदांमध्ये व्हिटॅमिन ई आढळते, जे त्वचेला दीर्घकाळ हायड्रेट ठेवण्यास मदत करते.

तुमच्या त्वचेवर काळे डाग आणि पिगमेंटेशनची समस्या असेल तर हा फेसपॅक खूप प्रभावी ठरू शकतो. दूध आणि सफरचंदातील आवश्यक गुणधर्म त्वचेची खोलवर स्वच्छता करण्यास मदत करू शकतात.

फेस पॅक कसा तयार करायचा?

सफरचंद ४ तुकडे, कच्चे दूध २ चमचे, मध १ टीस्पून.

कृती- सफरचंद आणि दुधाचा फेस पॅक बनवण्यासाठी फक्त कच्चे दूध वापरा. एका भांड्यात ४ सफरचंदाचे तुकडे ठेवा आणि मॅशरने मॅश करा. नंतर त्यात १ चमचा मध घाला आणि चांगले मिसळा. शेवटी २ चमचे दूध घालून पेस्ट तयार करा.

# उरुळी कांचन येथील लँड डेव्हलपरला १० टक्के परताव्याचे आमिष दाखवून एकाने घातला १२ कोटींचा गंडा

**लोणी काळभोर, ता. १३ :** गुंतवणुकीवर अवघ्या काही दिवसांत ४ ते १० पट परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून एकाने उरुळी कांचन (ता. हवेली) येथील लँड डेव्हलपरला १२ कोटी ६० लाख रुपयांचा गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकारामुळे पूर्व हवेलीत एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी आशिष एकनाथ कांचन (वय ३९, रा. एरिगेशन कॉलनी, उरुळी कांचन, ता. हवेली) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार प्रविण तुळशीराम संकपाळ (रा. प्रोग्रेसिव्ह बिल्डिंग, वाशी, नवी मुंबई) आणि त्याच्या कंपनीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आशिष कांचन हे २००८ पासून जमीन खरेदी-विक्री व लँड डेव्हलपिंगचा व्यवसाय करतात. व्यवहारात कधी कधी त्यांचा पुतण्या अभिषेक अरविंद कांचन हा भागीदार म्हणून सोबत असतो. मार्च २०२२ मध्ये अभिषेक कांचनच्या ओळखीतील व्यक्तींमार्फत आशिष कांचन यांची प्रविण संकपाळ याच्याशी कवडीपाट येथील जयश्री हॉटेलमध्ये भेट झाली. त्या वेळी संकपाळ याने स्वतःची ओळख करून देताना एमआयडीसी परिसरात कंपन्यांसाठी जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार करीत असल्याचे सांगितले. विविध नामांकित कंपनी मालकांशी संबंध असल्याचे सांगत त्याने काही फोटोही दाखवले.




याचवेळी त्याने एमआयडीसी परिसरातील जमिनीत गुंतवणूक केल्यास ४ ते १० पट नफा मिळतो, असे सांगत कांचन यांना गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले. आरोपी संकपाळच्या बोलण्यावर विश्वास ठेवून २३ मार्च २०२२ रोजी कांचन यांनी ५० लाख रुपये आरटीजीएसद्वारे त्याच्या कंपनीच्या खात्यावर वर्ग केले. त्यानंतर अवघ्या दोन-तीन दिवसांतच संकपाळने त्यांना पुन्हा जयश्री हॉटेलमध्ये बोलावून २५ लाख रुपये रोख नफा दिला. अतिशय कमी कालावधीत इतका मोठा परतावा मिळाल्याने कांचन यांचा संकपाळवर विश्वास बसला.

यानंतर ३० मार्च २०२२ रोजी झालेल्या दुसऱ्या भेटीत संकपाळने आंध्रप्रदेशातील पेंडुकोडा येथे किया कंपनीसमोर २८ एकर जागेवर लॉजिस्टिक गोडाऊन प्रकल्प उभारण्याचे स्वप्न दाखवले. या प्रकल्पात गुंतवणूक केल्यास मोठा फायदा मिळेल, असे सांगत त्याने ४ कोटी ८५ लाख रुपयांची गुंतवणूक करण्यास सांगितले.आरोपी संकपाळवर विश्वास ठेवून ५ एप्रिल ते ११ एप्रिल २०२२ दरम्यान आशिष कांचन व अभिषेक कांचन यांनी विविध बँक खात्यांतून ४.८५ कोटी रुपये त्याच्या कंपनीच्या खात्यात वर्ग केले. एप्रिल ते ऑगस्ट २०२२ दरम्यान संकपाळने वारंवार अधिक गुंतवणुकीची मागणी केली. त्यानुसार फिर्यादी आशिष कांचन व त्यांच्या भागीदाराने वेळोवेळी एकूण १२ कोटी ६० लाख ५५ हजार रुपये त्याच्या वैयक्तिक आणि कंपनीच्या बँक खात्यांवर वर्ग केले. या गुंतवणुकीच्या बदल्यात डिसेंबर २०२२ पर्यंत ३५ कोटी रुपयांपर्यंत परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखविण्यात आले होते. दरम्यान, गुंतवणुकीची सुरक्षा म्हणून संकपाळने प्रत्येकी ५ कोटी रुपयांचे तीन चेक दिले होते. मात्र ५ नोव्हेंबर २०२२ रोजी भरलेला चेक खात्यात रक्कम नसल्याने बाउन्स झाला. त्यानंतर पुन्हा २८ नोव्हेंबर २०२३ रोजी दुसरा चेक भरला असता तोही खाते बंद असल्याने वटला नाही. चेक बाउन्स झाल्यानंतर संकपाळने वारंवार वेगवेगळी कारणे देत पैसे देण्यास टाळाटाळ केली. चौकशीदरम्यान त्याने १५ जून २०२५ पर्यंत केवळ ६१ लाख ४० हजार रुपये ऑनलाइन परत केले, मात्र उर्वरित ११ कोटी ९९ लाख १५ हजार रुपये दिली नाही.

या प्रकरणी आशिष कांचन यांनी आर्थिक गुन्हे शाखेत दिलेल्या तक्रारीनंतर हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्यानुसार प्रविण तुळशीराम संकपाळ व त्याची कंपनी हरेकृष्णा इंडस्ट्रियल अ‍ॅन्ड लॉजिस्टिक पार्क्स प्रा. लि. यांच्या विरोधात लोणी काळभोर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३१६ (२), ३१६ (३) आणि ३१८ (४) अंतर्गत फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून या आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी सुरू असून, कोट्यवधी रुपयांच्या या गुंतवणूक फसवणुकीमुळे व्यावसायिक वर्तुळात खळबळ उडाली आहे.

# दौंड तालुक्यात पेट्रोल, डिझेल सह गॅस सिलेंडरचा पुरेसा साठा; अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. १३ : सध्या सर्वत्र गॅस सिलेंडर साठी मोठी गर्दी होत असून दौंड तालुक्यात ही अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे याबाबत दौंड तहसील कार्यालय मार्फत जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. सध्या चालू असलेल्या युध्दाचा पार्श्वभूमीवर इंधन पुरवठ्याबाबत खबरदारीच्या जिल्हा प्रशासनाच्या वतीने उपाययोजना करण्यात येत असून जिल्हयात कार्यरत असलेल्या भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड या तिन्ही कंपन्यांचा दौंड तालुक्यातील पेट्रोल, डिझेल तसेच एल. पी. जी. गॅस सिलेंडरचा पुरेसा साठा उपलब्ध असुन त्याचा नियमित व सुरळीत पुरवठा करण्यात येईल. असे संबंधित कंपन्यांकडून सांगण्यात आले आहे.



सर्वत्र गॅस दरांच्या किमतीत बदल झाले असून दौंड तालुक्यात मार्च २०२६ च्या सुरुवातीला घरगुती गॅस सिलिंडरच्या (१४.२ kg) दरात वाढ झाली असून सध्या घरगुती सिलेंडरचा दर प्रति सिलेंडर ९२६.५०/- रुपये झाला आहे. तसेच व्यावसायिक सिलेंडरच्या किंमतीतही वाढ झाली असून तो १९२५ रुपये इतका झाला आहे. तसेच महिन्याला मिळणाऱ्या घरगुती सिलेंडरची मर्यादा २१ दिवसावरुन २५ दिवस करण्यात आली आहे.

जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन तसेच ऑईल कंपनी जिल्हयातील गॅस सिलेंडर सह पेट्रोल व डिझेल साठा कायम राहिल याबाबत कटीबध्द असून जिल्हयातील गॅस सिलेंडरचा, पेट्रोलचा व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याने पंपावर व गॅस एजन्सीवर अनावश्यक गर्दी टाळावी तसेच अफवांवर विश्वास ठेऊ नये असे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच गॅस सिलेंडरचा काळा बाजार करणाऱ्यावर जिवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ नुसार दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्यात येईल असे दौंडचे तहसीलदार अरुण शेलार यांनी पत्राद्वारे सांगितले आहे.

# एकतर्फी प्रेमातून तरुणीवर जीवघेणा हल्ला करणाऱ्या तरुणाची आत्महत्या

**पुणे, ता. १३ :** पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात घडलेल्या एका धक्कादायक घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. एका कॉलेजमध्ये शिकणाऱ्या तरुणीवर एकतर्फी प्रेमातून जीवघेणा हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यानंतर फरार झालेला संशयित तरुण नंतर टेकडीवर गळफास घेतलेल्या अवस्थेत मृत आढळून आला. या घटनेमुळे परिसरात विविध चर्चा सुरू झाल्या आहेत.

मृत तरुणाचे नाव महेश डामसे असे आहे. त्याचे त्याच गावातील एका तरुणीवर एकतर्फी प्रेम होते. काही दिवसांपूर्वी त्याने त्या तरुणीकडे लग्नासाठी विचारणा केली होती. मात्र तरुणीने त्याच्या प्रस्तावाला स्पष्ट नकार दिला होता. या नकारामुळे महेश नाराज झाला होता आणि त्याच्या मनात राग निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे.

बुधवारी सकाळी संबंधित तरुणी जुन्नर येथील आदिवासी मुलींच्या शासकीय वस्तीगृहातून महाविद्यालयाकडे जाण्यासाठी बाहेर पडली होती. त्यावेळी वस्तीगृहाजवळ थांबलेल्या महेशने तिला अडवले. काही समजण्याच्या आत त्याने जवळ असलेल्या कोयत्याने तिच्या डोक्यावर आणि चेहऱ्यावर वार केले. या अचानक झालेल्या हल्ल्यात तरुणी गंभीर जखमी झाली आणि रक्ताच्या थारोळ्यात पडली.

घटनेनंतर आरोपी महेश घटनास्थळावरून फरार झाला होता. माहिती मिळताच जुन्नर पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला. दरम्यान, पुढील दिवशी सकाळी परिसरातील एका टेकडीवर महेशची दुचाकी आढळून आली. त्यानंतर परिसरात शोध घेतला असता जवळील झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत त्याचा मृतदेह पोलिसांना सापडला.

# घरफोडी करून चोरट्यांनी दोन लाखांच्या सोन्याच्या दागिन्यांवर मारला डल्ला

**यवत, ता. १३ :** अज्ञात तीन चोरट्यांनी टेरेसवरून घरात प्रवेश करून तब्बल सव्वा दोन लाखांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना गुरुवारी (ता. १२) पहाटे सव्वा तीन वाजण्याच्या सुमारास रोटी (ता. दौंड) हद्दीत घडली.

या प्रकरणी अज्ञात तीन चोरट्यांच्या विरोधात यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी राजेंद्र व्यंकट जगताप (वय-६३, व्यवसाय शेती, रा. रोटी, ता. दौंड) यांनी यवत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राजेंद्र जगताप हे रोटी येथे कुटुंबीयांसोबत राहतात. गुरुवारी (ता. १२) पहाटे सव्वा तीन वाजण्याच्या सुमारास अज्ञात तीन चोरट्यांनी जगताप राहत असलेल्या घराच्या टेरेसवरून घरात प्रवेश केला.

यावेळी घरातील लोखंडी कपाट उघडत कपाटातील सोन्याचे झुबे, डोरले, सोन्याची अंगठी, नथ, व रोख रक्कम सुमारे २० हजार असा मुद्देमाल लंपास केला. हा सर्व प्रकार गुरुवारी सकाळी उघडकीस आला. यामुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, अज्ञात चोरट्यांनी जगताप यांच्या पत्नी मंदाकिनी जगताप यांच्या सोन्याच्या दागिन्यांसह रोख रक्कम असा एकूण २ लाख २३ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

याप्रकरणी राजेंद्र जगताप यांनी दिलेल्या तक्रारीनुसार अज्ञात तीन चोरट्यांच्या विरोधात यवत पोलीस ठाण्यात बी.एन.एस. कलम ३०५, ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास यवत पोलीस करीत आहेत.

# दहा वर्षे पूर्ण झालेल्या बँक संचालकांना निवृत्तीचे नारळ

**पुणे, ता. १३ :** केंद्र सरकारच्या बँकिंग कायदा (सुधारणा) अधिनियम २०२५ च्या अंमलबजावणी बाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. या कायद्यानुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील संचालकांच्या कार्यकाळाबाबत नवीन नियम लागू करण्यात आले आहेत. विशेषतः ज्या संचालकांनी १० वर्षांपेक्षा जास्त काळ संचालक म्हणून काम केले आहे, त्यांना पुढील निवडणुकांमध्ये अपात्र ठरवण्याचा निर्णय या अधिनियमात नमूद करण्यात आला आहे.


या संदर्भात केंद्र सरकारच्या अर्थमंत्रालयाने १ ऑगस्ट २०२५ रोजी बँकिंग सुधारणा अधिनियम २०२५ बाबत अधिसूचना जारी केली होती. त्यानंतर १० फेब्रुवारी २०२६ रोजी शासनाकडूनही यासंबंधी पत्र जारी करण्यात आले. तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेने १८ फेब्रुवारी २०२६ रोजी पत्राद्वारे या विषयावर स्पष्टीकरण दिले असल्याची माहिती समोर आली आहे. नवीन तरतुदीनुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये ज्या संचालकांनी १० वर्षांपेक्षा अधिक काळ संचालक म्हणून कार्य केले आहे, त्यांना पुढील निवडणुकीसाठी पात्र राहता येणार नाही. तसेच एखाद्या संचालकाने सलग १० वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर त्यांनाही पुढील काळात संचालक म्हणून राहता येणार नाही, असे या अधिनियमात नमूद करण्यात आले आहे.




या नवीन नियमांमुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या निवडणुकांमध्ये मोठे बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अनेक ठिकाणी दीर्घकाळ संचालक म्हणून कार्य करणाऱ्या पदाधिकाऱ्यांवर याचा परिणाम होऊ शकतो, असे जाणकारांचे मत आहे.

# धायरीत २८ वर्षीय तरुणाची निर्घृण हत्या

**पुणे, ता. १३ :** शहरात गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसत आहे. अशातच सिंहगड रस्ता परिसरातील धायरी भागात एका २८ वर्षीय तरुणाची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. नात्यातील एका मुलीला होणारा त्रास थांबवण्यासाठी मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या तरुणावर हल्ला करण्यात आला. या घटनेमुळे धायरी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नांदेड सिटी पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मृत तरुणाचे नाव विशाल प्रशांत हबीब (वय २८, रा. धायरी) असे आहे. विशाल हा व्यवसायाने टेलर होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयित आरोपी आदित्य उमाप हा विशालच्या नात्यातील एका मुलीला वारंवार त्रास देत होता. याबाबत विशालने आदित्यला समज देत मुलीला त्रास देऊ नकोस असे सांगितले होते. मात्र याच कारणावरून आरोपीने राग मनात ठेवला असल्याचे सांगितले जात आहे.

११ मार्चच्या रात्री विशाल धायरी परिसरातील डीएसकेरस्त्यावरून जात असताना दळवीवाडी फाट्याजवळ आरोपीने त्याला अडवले. त्यानंतर आरोपीने आपल्या जवळ असलेल्या लाकडी बॅटने विशालवर वार केले. डोक्यावर आणि शरीरावर जोरदार मारहाण केल्याने विशाल गंभीर जखमी झाला. हल्ला इतका तीव्र होता की तो रक्ताच्या थारोळ्यात कोसळला आणि त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

घटनेनंतर आरोपी आदित्य उमाप हा फरार झाला असून पोलिसांकडून त्याचा शोध सुरू आहे. या प्रकरणी नांदेड सिटी पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय सावंत करत आहेत. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# लोणी काळभोर येथील अट्टल सोनसाखळी चोरास खंडणी विरोधी पथकाकडून अटक

**लोणी काळभोर, ता. १२ :** घरफोडी, पोलिस असल्याची खोटी बात करून नागरिकांना गंडा घालणाऱ्या एका अट्टल सोनसाखळी चोरास खंडणी विरोधी पथक क्रमांक २ने अटक केली आहे. मुसलीम नासीर बेग (इराणी) वय ३७ रा. पठारे वस्ती लोणी काळभोर पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खंडणी विरोधी पथक २ कडील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार पुणे शहर पोलीस आयुक्तालय हद्दीतील गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंगकामी व गोपनीय माहिती काढुन गुन्ह्यातील पाहिजे व फरारी आरोपींचा शोध घेत होते. पथकातील पोलीस हवालदार नितीन मुंढे व पोलीस अंमलदार कानिफनाथ कारखेले यांना वाघोली पोलिस ठाण्यातील भारतीय न्याय संहीता कलम ३०९ (५).३ (५) गुन्ह्यातील पाहिजे असलेला आरोपी हा लोणी काळभोर येथे आहे. अशी माहिती एका खबऱ्या मार्फत मिळाली होती.



मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलिसांनी सदर ठिकाणी छापा टाकला तेव्हा आरोपी जमावात शिरला होता. पोलिसांनी इराणी वस्तीमधील जमलेल्या जमावातुन त्यास शिताफिने ताब्यात घेतले. आरोपीवर शिरुर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहीता कलम २०४,३१६ (२),३१८ (४),३ (५) नुसार गुन्हा दाखल असुन त्यात देखील तो पाहीजे आरोपी आहे. आरोपीवर महाराष्ट्रातील विविध पोलीस ठाण्यात चेनस्नॅचिंगचे, पोलीस बतावणी, वाहन चोरीचे तसेच घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत. ही कामगिरी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त, पंकज देशमुख, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) निखील पिंगळे, सहाय्यक पोलिस आयुक्त राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथक २ गुन्हे शाखा कडील पोलीस निरीक्षक राम राजमाने, पोलिस हवालदार नितीन मुंढे, कारखेले, जगदाळे, गोरे यांच्या पथकाने केली आहे.

# आमंत्रण ८०० जणांना, पण जेवण १५० साठीच! गॅस टंचाईमुळे पाहुण्यांची यादी घटली

**पुणे, ता. १३ :** लग्नसराईचा हंगाम सुरू असतानाच गॅस सिलिंडरच्या टंचाईने केटरिंग व्यवसाय अडचणीत सापडला आहे. अचानक उद्भवलेल्या आंतरराष्ट्रीय तणाव आणि पुरवठा साखळीतील अडचणींमुळे व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा कमी झाला आहे. परिणामी, अनेक केटरर्सना आधीच घेतलेल्या लग्नाच्या ऑर्डर पूर्ण करताना मोठी कसरत करावी लागत आहे.

काही ठिकाणी केटरिंग व्यावसायिकांनी ग्राहकांना स्पष्ट शब्दांत सांगितले आहे.आम्ही तुमची ऑर्डर ६ महिन्यांपूर्वी घेतली होती. पण सध्या गॅस सिलिंडर उपलब्ध नसल्याने ८०० ते ९०० पाहुण्यांच्या जेवणाची व्यवस्था करणे कठीण आहे. जास्तीत जास्त १२५ ते १५० पाहुण्यांपर्यंतच जेवण बनवता येईल. त्यापेक्षा जास्त पाहुणे असतील तर सिलिंडरची व्यवस्था तुम्हालाच करावी लागेल.

लग्नाचे कार्यक्रम ठरल्यामुळे बहुतेक कुटुंबांनी आधीच मेन्यू आणि पाहुण्यांची संख्या निश्चित केलेली आहे. मात्र गॅसटंचाईमुळे केटरर्सना पदार्थांची संख्या कमी करणे किंवा पाहुण्यांची यादी कमी करण्याची विनंती करावी लागत आहे. अनेक समजूतदार ग्राहक परिस्थिती समजून घेत बदल स्वीकारत आहेत. काही ठिकाणी तर पाहुण्यांची संख्या एक तृतीयांशपर्यंत कमी करण्याचा निर्णयही घेतला जात आहे.

केटरिंग व्यवसायावर मोठी आर्थिक साखळी अवलंबून असते. या क्षेत्रात स्वयंपाकी, वेटर्स, भांडी पुरवठादार, डेकोरेशन कामगार, वाहतूक कर्मचारी अशा शेकडो लोकांचे रोजगार जोडलेले असतात. शिवाय, केटरिंगसाठी लागणारा बहुतांश कच्चा माल नाशवंत असल्याने ऑर्डर रद्द झाल्यास मोठे आर्थिक नुकसान होते.




केटरिंग व्यावसायिक सचिन देवधर सांगतात, करोनानंतर आता गॅसटंचाई ही आमच्यासाठी दुसरी मोठी आपत्ती ठरली आहे. ऑर्डर कमी झाल्या तर कर्मचारी कमी करावे लागतील. सरकारने किमान दररोज १ किंवा २ व्यावसायिक सिलिंडर नियमित उपलब्ध करून द्यावेत.

दरम्यान, पुण्यातील कोथरूड येथील आशीर्वाद डायनिंग हॉलचे संचालक हेमंत राजवाडे यांनीही परिस्थितीची गंभीरता सांगितली. सिलिंडर उपलब्ध नसल्याने सायंकाळच्या वेळेत डायनिंग हॉल बंद ठेवण्याचा निर्णय घ्यावा लागल्याचे त्यांनी सांगितले. सध्या बाहेरील केटरिंग ऑर्डरही तात्पुरत्या थांबवण्यात आल्या आहेत.

गॅस पुरवठा सुरळीत झाला नाही, तर लग्नसमारंभ, हॉटेल आणि केटरिंग उद्योगावर याचा मोठा परिणाम होण्याची भीती व्यावसायिक व्यक्त करत आहेत. त्यामुळे सरकारने लवकरात लवकर पुरवठा सुरळीत करण्याची मागणी उद्योगातून होत आहे.